# प्रकरण चौथे

# प्रजासमाजवादी पक्ष आणि ना. ग. गोरे

## प्रकरण ४ थे

# प्रजासमाजवादी पक्ष आणि ना. ग. गोरे

प्रस्तावना -

ना. ग. गोरे हे एक निष्ठावंत समाजवादी होते. केवळ समाजवादाचे प्रकांड पंडित नव्हे, तर त्यातील उदात्त मूल्ये प्रत्यक्ष जीवनात जगणारे एक कर्मयोगी होते. ना. ग. गोरे यांनी आयुष्यभर समाजवादी विचारांचा आणि सामाजिक समतेचा पाठपुरावा केला. ते समता व समाजवादी, निधर्मवादी समाजाच्या रचनेसाठी सतत धडपडत राहिले.

ना. ग. गोरेंनी विचाराहून कृतीला आपल्या जीवनात अधिक महत्त्व दिले. समाजवादाचा विचार सर्वदूर पोहोचविणारे ज्येष्ठ कृतिशील विचारवंत व साहित्यिक म्हणून ना. ग. गोरेंना ओळखले जाते. त्यांनी आपल्या आयुष्यात विचारांना कृतींची जोड दिली होती.

प्रस्तुत प्रकरणात ना. ग. गोरेंच्या प्रजासमाजवादी पक्षातील सक्रिय सहभागाचा अभ्यास करण्यात आला आहे. राजकीय आघाडीवरचे एक प्रभावी नेते म्हणून ना. ग. गोरेंची ख्याती होती. समाजवादी आंदोलनाला आशय आणि आकार देण्याच्या कामात ना. ग. गोरेंचा मोठा वाटा होता. कार्यकर्त्यांच्या तीन पिढया त्यांच्या नेतृत्वाखाली तयार झाल्या. समाजवादी चळवळ मानणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांच्या मार्गदर्शनाचा आधार वाटत होता. परिवर्तनवाद्यांच्या पीछेहाटीमुळे नामोहरम किंवा निराश न होता अखेर पर्यंत उंच स्वरात ना. ग. गोरे यांनी आपली मानवतावादी आणि परिवर्तनवादी भूमिका निर्भिडपणे मांडली. एस. एम. जोशी, आर. के.

खाडिलकर या तरूण मित्रांच्या बरोबरच त्यांनी राजकीय आणि सामाजिक आंदोलनात स्वतःला झोकून दिले. त्यांची वाणी आणि लेखणी समाजपरिवर्तनवादी होती. त्यांच्या सर्व पुस्तकांचा मूलाधार प्रबोधन हाच आहे. ना. ग. गोरेंचा सर्वाधिक विश्वास तरूणांवर होता. तरूणांनी समाजपरिवर्तनासाठी संघटितपणे लढा देणे अत्यंत गरजेचे आहे. जातियतेने, भ्रष्टाचाराने आणि धर्मांधतेने किडलेला समाज केवळ या देशातील तरूणच बदलू शकतील असे ते नेहमी म्हणत.

ना. ग. गोरेंनी लोकसत्ता आणि समाजवाद ह्या ध्येयांशी इमान राखले आणि वित्तहानी, शक्ति हानी आणि मानहानी पत्करून भारतामध्ये पुरोगामी विरोधी पक्षाच्या पायाभरणीचे कार्य केले. ना. ग. गोरेंनी ''सोशॉलिस्ट'' हे केवळ एका पक्षाचे नाव नसून तो एक स्वतःच्या जीवनात स्वीकारण्याचा मार्ग आहे हे त्यांनी स्वतः सप्रयोग सिध्द केले. ना. ग. गोरें आणि एस. एम. जोशी दोघेंही समाजवादयांचे मार्गदर्शक होते. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा उद्घोष करताना ही सामाजिक आर्थिक समतेच तत्त्व ते जपत आले. राष्ट्रसेवा दल व समाजवादी वा प्रजासमाजवादी पक्ष यासाठी ते सदैव कार्यरत राहिले.

### प्रजासमाजवादी पक्ष

१९३०-३२ च्या आंदोलनात जय प्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, मेहेरअली, ना. ग. गोरे आदी कार्यकर्ते समाजवादी विचारांकडे आकर्षित झाले होते. काँग्रेस पक्षात हे समाजवादी विचारसरणीचे नेते होते. भारताचे स्वातंत्र्य हे शेतकरी आणि कामगारांसाठीच असले पाहिजे आणि त्यासाठी स्वातंत्र्य चळवळीला समाजवादी विचारांची व चळव्ळीची जोड दिली पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. यासाठी १९३४ साली त्यांनी काँग्रेस पक्षांतर्गत समाजवादी पक्षाची स्थापना केली. 'लोकशाही

समाजवादी' आणि 'शोषणाविरहीत समाजनिर्मिती' हे या पक्षाचे उद्दिष्ट होते. स्वातंत्र्य समाजवादी पक्ष काँग्रेसमध्ये राहून स्वातंत्र्य संग्रामात लढला त्यावेळी काँग्रेस हे देशव्यापी व्यासपीठ होते. या व्यासपीठावर विविध मतांचे वेगवेगळे पक्ष, संघटना, व्यक्ती एकत्र येऊ शकत होत्या. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काँग्रसने पक्षाची घटना बदलली काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत अन्य पक्षाचे अस्तित्व असणार नाही, अशी तरतूद केली त्यामुळे काँग्रेसमधून बाहेर पडून स्वतंत्रपणे राजकीय कार्य करण्याचा आणि जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी व मार्गांसाठी काम करण्याचा निर्णय समाजवादी पक्षाने घेतला. १९४८ साली समाजवादी विचारसरणीचा हा गट काँग्रेस पक्षातून बाहेर पडला. आणि समाजवादी पक्षाची स्थापना झाली.

ना. ग. गोरे समाजवादी पक्षात राहून तरूणांचे राजकीय शिक्षण करत होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नवसमाजनिर्मितीचे कार्य कसे करावयाचे यासंबंधी त्यांना मार्गदर्शन करावयाचे यासाठी त्यांनी अनेक शिबिरातून बौध्दिके घेतली. लोकशाही समाजवाद रूजविण्याचा प्रयत्न करीत होते. भारत हे प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून अस्तित्वात आल्यानंतर १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या. या निवडणूकीत समाजवादी पक्षाला लोकसभेच्या १२ जागा मिळाल्या १९५२ साली झालेल्या निवडणूकीत काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले. समाजवादी पक्षाचा पराभव झाला. एस. एम. जोशी आणि ना. ग. गोरे दोघेही समाजवादी नेते पराभूत झाले. त्यावेळच्या वस्तुस्थितीचा फायदा काँग्रेस पक्षाला झाला. समाजवादी पक्षात संघटनेचा, राजकीय, शिक्षणाचा अभाव असल्यामुळे त्यांचा पराभव झाला. १९५२ साली समाजवादी पक्ष व आचार्य कृपलानी यांचा कृषक मजदूर प्रजा पक्ष या दोहोत युती होऊन प्रजासमाजवादी पक्ष स्थापन झाला. १

१९५२ च्या निवडणूकीनंतर ना. ग. गोरेंनी स्त्रियांसाठी राखीव जागांची मागणी केली. त्यांच्या मते, आम्ही समता मागतो. राखीव जागा मागणार नाही. समाजवादी पक्षाने स्त्रियांना राजकारणात पुढे आणावे. याबाबतीत प्रथमच्या काळात तरी आस्था दाखवली नव्हती. पण ना. ग. गोरे अपवाद होते. त्यांनी सुमतीबाईंना विधासभेसाठी उभे केले व त्या निवडूनही आल्या होत्या. समाजवादी महिला सभेच्या कामात पुढे पुढे त्यांनी बराच रस घेतला. राष्ट्रीय प्रश्नांतील शंकांचे निरसन करून घेण्यास महिला कार्यकर्त्या त्यांच्याकडे जात. समाजवादी महिला सभेला त्यांनी आपल्या घरातील हॉलकायमचा दिला. त्याठिकाणी कौटुंबिक सल्ला केंद्र चालू आहे. ना. ग. गोरेंच्या मते, परिवर्तनाच्या चळवळीत महिलांनी अग्रेसर राहिले पाहिजे. २

१९५२ साली स्थापन झालेला प्रजासमाजवादी पक्ष फार काळ एकसंघ राहिला नाही. १९५३ सालानंतर समाजवादी पक्षात मतभेदांना सुरूवात झाली. कारण १९५४ साली जयप्रकाश नारायण पक्षातून बाहेर पडले तसेच डॉ. राममनोहर लोहिया पक्षातून बाहेर पडले व त्यांनी १९५४ साली ''भारतीय समाजवादी'' पक्षाची स्थापना केली.

१९५७ मध्ये ना. ग. गोरे 'संयुक्त महाराष्ट्र समिती' पुरस्कृत प्रजासमाजवादी उमेदवार म्हणून पुणे शहरातून लोकसभेवर निवडून गेले. ना. ग. गोरेंनी लोकसभेच्या कार्यावर आपल्या समतोल विचारांची छाप पाडली. विशेषत: संरक्षणाच्या समस्येत त्यांनी रस घेतला. संरक्षण सल्लागार समितीच्या कामकाजात त्यांनी मोलाची भर टाकली. चिनी आक्रमणाच्या काळात संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये काही घटक पक्षांनी बोटचेपपणाची भूमिका घेतली असताना ना. ग. गोरेंनी समितीस स्पष्टपणे

बजावले की, ''सार्वभौम देशाच्या सीमांच्या रक्षणाच्या प्रश्नावर आम्ही कुठलीही तडजोड करणार नाही. ज्यांच्या महाराष्ट्रनिष्ठेला राष्ट्रनिष्ठेचा आधार नसेल त्यांनी पाहिजे तर समिती सोडावी. राष्ट्रीयत्वाच्या प्रश्नावर तडजोड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.'' ३

ना. ग. गोरे लोकसभेवर निवडून गेल्यावर अभ्यासू वृत्ती आणि इंग्रजी व हिंदी या दोन्ही भाषांवरील प्रभुत्व यामुळे अल्पकाळातच त्यांनी आपला प्रभाव पाडला. ना. ग. गोरे यांच्या कामात कमालीची शिस्त होती. ते लोकसभेचे सदस्य असताना तेथे विचारावयाच्या प्रश्नासंबंधी ते संपूर्ण माहिती गोळा करीत. त्यामुळे त्यांनी विचारलेले उपप्रश्न अनेकदा मंत्र्यांना अडचणीत टाकीत असत. प्रश्न, लक्षवेधी सूचना, अल्पकाळ चर्चा, अप्रशासकीय प्रस्ताव ही सर्व संसदीय आयुधे ते कुशलतेने वापरीत. अर्थसंकल्पाचा ते काळजीपूर्वक अभ्यास करीत आणि काही अडचण आल्यास तत्त्वज्ञांची मदत घेत होते. ना. ग. गोरे आणि बॅ. नाथ पै हे नेहमी आपपसात चर्चा करून कोणत्या विषयावर कोणी बोलावयाचे ते ठरवीत असत नाथ पैंच्या भाषा प्रभुत्वाबद्दल, वक्तृत्वाबद्दल ना. ग. गोरेंना फार मोठे कौतुक व अभिमानही वाटत असे. ना. ग. गोरेंना ''पब्लिक अकौंटस् कमिटी'' आणि ''एस्टिमेंटस कमिटी'' यांच्यावर काम करायला मिळाले.

ना. ग. गोरे यांनी संसद सदस्य असताना त्यावेळचे लोकसभा अध्यक्ष अनंतशयनम् अय्यंगार यांच्या समवेत संसदेची ओळख विद्यार्थ्यांना करून देणारे पुस्तक प्रथम इंग्रजीत लिहिले आणि नंतर त्याचा मराठीत 'आपली संसद' असा अनुवाद केला. या पुस्तकांचे भाषांतर हिंदी आणि अन्य सर्व भारतीय भाषामध्ये झाले. सुरूवातीस या पुस्तकामध्ये आपल्या राज्यघटनेचे स्वरूप अत्यंत सोप्या

रीतीने विद्यार्थ्यांना  समजून सांगितले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही राज्यपध्दती स्वीकारल्यावर आपली लोकसभा कशी अस्तित्वात आली. याचे अत्यंत सुगम विवेचन आहे.

संयुक्त महाराष्ट्र समितीने १९५५ पासून नेटाने चालविलेल्या लढयाला अखेर यश आले आणि १ मे १९६० ला मुंबईसह संयुक्त  महाराष्ट्राची निर्मिती झाली. १९६० नंतर यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, आणि महाराष्ट्रातील राजकारणाचे स्वरूप आमूलाग्र बदलले. १९५७ मध्ये मुख्यमंत्री असताना यशवंतराव चव्हाण यांनी अत्यंत सहिष्णु व सर्वसमावेशक धोरण ठेवले होते. १९६० नंतर त्यांनी विरोधी पक्षांतील अनेक तरूण कार्यकर्त्यांना सत्तेत सहभागी होण्याचे आवाहन केले आणि शेतकरी, कामगार पक्ष, समाजवादी पक्ष या संयुक्त महाराष्ट्र समितीतील प्रमुख पक्षांचे अनेक तरूण कार्यकर्ते काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यामुळे १९५७ मधील निवडणूकीचे चित्र १९६२ मध्ये आमुलाग्र बदलले. एस. एम. जोशी हे पूर्वीच्या मतदार संघातून त्यांचे पूर्वी सहकारी असलेले आणि १९६० नंतर काँग्रेसमध्ये गेलेले श्री राम तेलंग यांच्याकडून पराभूत झाले. पुणे शहर लोकसभा मतदार संघात प्रजासमाजवादी पक्षातर्फे ना. ग. गोरे, संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे आचार्य अत्रे आणि काँग्रेसतर्फे शंकरराव मोरे हे उभे होते. विरोधी पक्षाची मते विभागली गेल्यामुळे शंकरराव मोरे हे विजयी झाले. ना. ग. गोरे यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा यात काँग्रेसला भरघोस बहुनत मिळाले.

राजकारणाची ही सर्व धकाधक चालू असतानाही ना. ग. गोरे समाजवादी पक्षातील आणि राष्ट्र सेवादलातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'जनवाणी'

'साधना' या साप्ताहिकांतून नियमाने लेखन करीत या त्यांच्या लेखांमध्ये त्या वेळच्या महत्त्वाच्या राजकीय व सामाजिक प्रश्नांचे विवेचन असले तरी ते केवळ प्रासंगिक नसे. कारण ना. ग. गोरेंनी प्रत्येक लेखामध्ये पुरोगामी वैचारिक दृष्टिकोण कार्यकर्त्यांसमोर मांडलेला आहे. ना. ग. गोरे हे लोकसभेचे सदस्य असताना त्यांना संसदेत माआ-त्से-तुंगच्या आक्रमक धोरणाबद्दल सरकारला इशारा दिला होता. ''माओत्से तुंगच्या रणनीतीची चतुःसूत्री'' हा चिनी आक्रमणापूर्वी लिहिलेला लेख ही याच विषयावर आहे. प. नेहरूंच्या परराष्ट्रविषयक धोरणातील कच्च्या दुव्यांवर ना. ग. गोरे यांनी अचूक बोट ठेवले आहे. 'महाराष्ट्रातील कार्यकर्त्यां प्रत' आणि 'नवा महाराष्ट्र धर्म' या दोन लेखांमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळी कार्यकर्त्यांनी बदलत्या परिस्थितीत काय केले पाहिजे याचे विवेचन आहे. ''जयप्रकाशांशी विचारविनिमय'' या लेखात गोरे यांनी जयप्रकाशजींनी पक्षविरहीत लोकशाहीचे जे समर्थन केले, त्यावर सडेतोड मतप्रदर्शन केले. त्यांच्या मते त्यावेळची समस्या राजकीय पक्ष कसे मोडावेत ही नसून लोकशाहीच्या मर्यादांचे भान ठेवून ते कसे चालवावेत ही आहे, असे ना. ग. गोरेंनी त्या लेखात स्पष्टपणे लिहून जयप्रकाशजींच्या भूमिकेचे खंडन केले आहे. ४

१९६२ च्या निवडणूकीत ना. ग. गोरे आणि एसेम हे दोघेही पराभूत झाले. ना. ग. गोरेंच्या मते, १९५७ साली संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जनतने आम्हाला निवडून दिले. संयुक्त महाराष्ट्र मिळाल्यानंतर समाजवादी पक्षाची भूमिका व कार्यक्रम यांचे मूल्यमापन करून लोकांनी आपल्याला बाजूस सारले. यामुळे खचून चालणार नाही. आपली भूमिका समाजात रूजेल यासाठी अधिक नेटाने प्रयत्न केले पाहिजेत.५

१९६४ साली प्रजासमाजवादी पक्षातील काही नेते अशोक मेहता यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षात सामील झाले. त्यामुळे प्रजासमाजवादी पक्षात राहिलेल्या नेत्यांनी डॉ-लोहिया यांच्या समाजवादी पक्षाशी युती केली, त्यातूनच संयुक्त समाजवादी पक्षाची स्थापना झाली. परंतु एक वर्षाच्या आतच श्री. त्रिलोकसिंह, ना. ग. गोरे, प्रेम भसिन इ. नेत्यांचा गट संयुक्त समाजवादी पक्षातून बाहेर पडला. त्यांनी पुन्हा प्रजासमाजवादी पक्षाची स्थापना केली. राष्ट्रीयकरण करणे, शोषणापासून मुक्तता व्हावयाची असेल तर मजूर-किसान लोकांच्या संघटना तयार करणे, अर्थसत्तेच्या व राज्यसत्तेच्या विकेंद्रिकरणाचे तत्त्व, शांततामय व लोकशाही मार्गानेच क्रांती करणे या सर्व तत्त्वांच्या दिशेने या पक्षाची वाटचाल चालू झाली होती. ६

समाजवादी शक्तींच्या ऐक्याचा, ना. ग. गोरेंनी मनःपूर्वक पाठपुरावा केला. परंतु दुर्दैवाने १९६५ मध्ये समाजवादी पक्षाच्या वाराणशी येथील अधिवेशनात पक्षात फुट पडली. ना. ग. गारेंनी प्रजासमाजवादी पक्षात राहण्याचा निर्णय घेतला. तर एस. एम. जोशी संयुक्त समाजवादी पक्षात सामील झाले. एस. एम. आणि ना. ग. गोरे या आयुष्यभर एकत्र काम केलेल्या नेत्यांनी वेगवेगळ्या पक्षात राहण्याचा जो निर्णय घेतला त्यामुळे त्यांचे अनेक अनुयायी फार व्यथित झाले. परंतु दोघांनाही स्वतःची भूमिकाच योग्य वाटत होती. ना. ग. गारेंनी ह्या संकटाच्या काळात प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारले आणि लोकशाही समाजवादी शक्ती मजबूत करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. ७

१९६५ मध्ये समाजवादी पक्षात फूट पडली. त्यामुळे अनेक कार्यकर्ते राजकारणापासून अलग झाले. समाजवादी चळवळीतील हा अत्यंत दुर्दैवी क्षण होता. विशेषतः एसेम आणि ना. ग. गोरे दोन वेगळया पक्षांत गेले याचे ना. ग. गोरेंना

वाईट वाटले. ना. ग. गोरे वैचारिक मतभेदांना कधीच भित नव्हते. त्यांच्या मते, पक्षामध्ये प्रामाणिक मतभेदांना स्थान असले पाहिजे. आणि विचार मंथनातून पक्षाचे निर्णय झाले पाहिजेत. असे त्यांना वाटत होते. यासाठी पक्षात परस्परांवर पूर्ण विश्वास असला पाहिजे. डॉ. लोहिया किंवा मधु लिमये यांच्यापेक्षा ना. ग. गोरेंची काम करण्याची पध्दत वेगळी असेल. परंतु समाजवादावरील त्यांची निष्ठा कोणापेक्षाही कमी नव्हती. ना. ग. गोरे प्रतिपक्षाशी उघडपणे लढत. पक्षातही वादविवाद करत परंतु पक्षांतर्गत दोन गटांनी एकमेकांवर मात करण्यासाठी डावपेच करणे हे त्यांच्या स्वभावाला पटत नव्हते. ८

वाराणसीला संयुक्त सोशालिस्ट पार्टी फुटली. ना. ग. गोरेंनी कार्यकारिणीच्या सभेत पक्ष फुटू नये म्हणून तीन दिवस ठरावाचे निरनिराळे मसुदे तयार केले. परंतु ते सर्व व्यर्थ जात होते. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी रात्री नऊ वाजता सुरू झालेली प्रमुख कार्यकर्त्यांची सभा पहाटे पाच वाजेपर्यंत चालली होती. तेथेही समझोत्याचे शेवटचे प्रयत्न वाया गेले. त्यावेळी ना. ग. गोरेंनी विषण्ण मनाने सभा त्याग केला. अखेर पूर्वाश्रमीच्या प्रजासमाजवादयांनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. एस. एम. जोशी त्या वेळी संयुक्त सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्ष होते ते प्रजासमाजवादी मित्रांच्या निर्णयाशी सहमत नव्हते. तथापि त्यांनी प्रजासमाजवादी मित्रांना आपण बाहेर का पडत आहोत याबाबतचे निवेदन अधिवेशनाच्या सुरूवातीला करण्याची परवानगी दिली. अनेक कार्यकर्त्यांची अपेक्षा होती की पक्ष टिकविण्यासाठी ज्या ना. ग. गोरेंनी शेवटपर्यंत आटोकाट प्रयत्न केले ते ना. ग. गोरे सदर निवेदन करतील तथापी तसे न करता ती जबाबदारी एच.व्ही. कामत यांच्यावर सोपविण्यात आली. ना. ग. गोरेंनी ते निवेदन केले असते तर पूर्वाश्रमीचे सोशालिस्ट व प्रजासोशालिस्ट

कार्यकर्ते मोठया संख्येने बाहेर आले असते. ना. ग. गोरेंनी भूमिका मांडली नाही म्हणून अनेक कार्यकर्ते त्यांच्यावर नाराज झाले. ९

स्वातंत्र्यलढयात सर्वांना पुष्कळच कष्ट, त्याग सहन करावा लागला होता. जीवन अर्पण करणाऱ्यापैंकी एक ना. ग. गोरे. पण पुढचा समाजवादाचा लढा हा अधिक कठीण होता. त्याची वाट स्पष्ट नव्हती. काँग्रेसने सत्तेची कास धरली होती. सत्तेच्या रस्सीखेचींमध्ये स्वार्थ व भ्रष्टाचार यानांच अधिक पोसले जात होते. अशा परिस्थितीत आपण वेगळे काय करणार ? समाजवादाची मूल्ये कशी जोपासणार? राज्यशकट चालवता येईल अशी स्वतंत्र संघटना कशी उभारणार ? कम्युनिस्टांपेक्षा स्वतंत्र असा आपला समाजवाद कोणता? - हे सर्व प्रश्न अतिशय कठीण होते. अशा परिस्थितीत खंबीर नेतृत्वाची गरज होती, आणि ती ना. ग. गोरे आणि एस. एम. यांनी प्रामुख्याने पूरी केली. ना. ग. गोरेंचे वैचारिक नेतृत्व निश्चितच सर्वांना बोधप्रद ठरले. समाजवादाच्या वाटचालीत काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्यापासून आमची विचारसरणी निराळी कशी, हे संभ्रमात पडलेल्या सामान्य जनतेला पटवून देण्याचे काम तर कठीण होतेच विरोधात राहून हा संघर्ष करावा लागत होता. पण त्याचबरोबर पस्तीस वर्षाच्या या काळात अंतर्गत संघर्षांनी आणि तणावांनीच समाजवादी शक्ती क्षीण होत गेली हे जास्तच दु:ख होते. अशा वेळी तरूण कार्यकर्त्यांना स्पष्ट मार्गदर्शनाची जशी जरूर होती तशीच त्यांचे मनोधैर्य टिकवण्याचीही फार मोठी आवश्यकता होती. ना. ग. गोरेंचा पिंड त्यावेळी पूर्ण राजकीय होता हे तर खरेच, पण बुध्दिनिष्ठा व तर्कशुध्दता या गोष्टी त्यांच्या विचारातून कधीच ढळल्या नाहीत हे विशेष समाजवदी पक्षात फूट पडली. तो काळ तर सर्वच कार्यकर्त्यांना अतीव दु:खाचा आणि त्याबरोबरच सर्वात कठीण असा होता. त्यावेळी

प्रजासमाजवादी पक्षाला ना. ग. गोरेंचेचे नेतृत्व लाभले. एस. एम. जोशीनी संयुक्त समाजवादी पक्ष' न सोडण्याचा निर्णय घेतला होता. इतकेच नाही तर त्याचे अध्यक्षपद स्वीकारले होते.

१९६६ साली विरोधी पक्षांच्या आघाडीच्या मंत्रिमंडळात सहभागी व्हायचे की नाही य बद्दलची समाजवादी पक्षाची भूमिका काहीशी व्दिधा होती. तीन राज्यांत पक्षाने प्रत्यक्ष मंत्रिमंडळात सहभाग घेतला होता, तर तीन राज्यांत बाहेरून पाठिंबा दिला होता. पण एकूण आघाडीतला अनुभव चांगला नव्हता. नाथ पै, ना. ग. गोरे हे आघाडीतून बाहेर यावे ह्याच मतांचे होते. ना. ग. गोरेंच्या मते, राज्यांना अधिक स्वायत्तता पाहिजे ही मागणी बरोबर असली तरी राष्ट्रहिताला कुठेही धोका पोचता कामा नये. आपल्याला सत्ता हातात घ्यावयाची तर चालवायला यंत्रणा सिध्द करावी लागेल.१०

समाज्वादी पक्षाच्या सुरूवातीच्या काळात काही कम्युनिस्ट पक्षात काम करताना पक्ष फोडण्याचे काम करीत होते. मसानी यांनी ते उघडकीस आणले तेव्हापासून कम्युनिस्टांच्या बरोबर युनायटेड फ्रंट करण्यास ना. ग. गोरेंनी विरोध केला. डॉ. लोहिया यांना अशी आघाडी करावी असे वाटत होते. परंतु ते ना. ग. गोरेंना पटत नव्हते. या बाबतीत त्यांना ना. गोखल्यांची नेमस्त कार्यपध्दतीच मान्य आहे. पक्ष लहान राहिला तरी चालेल पण तेथे भ्रातृभाव परस्पर विश्वास असला पाहिजे, अशी ना. ग. गोरेंची भूमिका होती.

१९६७ च्या निवडणूकीत डॉ. लोहिया यांनी विरोधी पक्षांची एकजूट घडवून आणली. त्यावेळी प्रजासमाजवादी पक्ष या आघाडीत सामील झाला नाही. डॉ. लोहियांच्या नेतृत्वाखालील आघाडीस उत्तर प्रदेश बिहार, मध्यप्रदेश यामध्ये बहुमत

मिळाले. इतरत्रही आघाडीस चांगल्या जागा मिळाल्या प्रजासमाजवादी पक्षास त्यामानाने अगदी कमी जागा मिळाल्या. काँग्रेसची मगरमिठी सुटण्यासाठी लोहियांनी जो पवित्रा घेतला तो व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीने यशस्वी ठरला हे ना. ग. गोरेंनी मान्य केले. आपण अलग राहिल्यामुळे लोकांमध्ये अप्रिय झालो. ही वस्तुस्थिती त्यांनी मान्य केली. परंतु काँग्रेस पक्षात वैचारिक दृष्टि नसल्यामुळे त्यामध्ये सामील व्हावयाचे हे प्रजासमाजवादी पक्षास मान्य नव्हते. ना. ग. गोरेंच्या मते, आम्ही विरोधी पक्षाच्या आघाडीपासून अलग राहिल्यामुळे विरोधी मतात विभागणी होते. हा आक्षेप यावयास नको असेल तर आपली जेथे ताकद असेल तेथेच फक्त निवडणूक लढवावयाची हे पथ्य पक्षाने पाळावयास हवे होते. दुर्देवाने मनोहर कोतवालसारख्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी गोरेंचे ऐकले नाही. त्यामुळे मुंबईत फार नुकसान झाले. डॉ. मंडलिक, दंडवते, वेर्दे हे अकारण पराभूत झाले.आणि त्यापेक्षाही पक्षाची तात्त्विक भूमिका मलीन झाली. शिवाय लोक त्यांच्यावर नाराज झाले. दक्षिण रत्नागिरीत असेंब्लीच्या चार जागा लढवून तीन जागा जिंकल्या आणि नाथ पै यांनी लोकसभेची जागा जिंकली अशी स्ट्रेटजीच सर्व ठिकाणी करावयास हवी होती. आपग आपल्या मर्यादा ओळखून विरोधी पक्षाच्या आघाडीस अपाय होऊ नये असे वागावे हे ना. ग. गोरेंचे म्हणणे पक्षाच्या कार्यकारणीत मान्य झाले परंतु अनेक ठिकाणी त्याची कार्यवाही झाली नाही हे त्यांना हे त्यांना त्यांचे राजकीय अपयश वाटते. ११

ना. ग. गोरे हे प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्ष असताना त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सतत लेखन केले. १९६७ ते १९७५ या काळात 'आव्हान आणि आवाहन' आणि 'ऐरणी वरील प्रश्न' हे दोन संग्रह प्रसिध्द झाले. ना. ग. गोरे

यांनी आर्थिक आणि सामाजिक समतेचा प्रखर पुरस्कार आपल्या लेखनातून केला. ना. ग. गोरे प्रखर बुध्दिवादी भूमिका घेत आणि समाजातील' दांभिकतेवर आणि अंधश्रध्देवर आपल्या लेखनातून सतत प्रहार करीत तात्त्विक प्रश्नावरील ना. ग. गोरेंचे विवेचन फार उद्‌बोधक असे ना. ग. गोरेंच्या मते, त्यावेळची खरी समस्या पक्ष कसे मोडावेत नसून पक्ष एकसंघ करणे ही आहे. १२

१९७० सालच्या जानेवारीत भरलेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सदय:स्थितीचा आढावा घेतला गेला. काँग्रेस पक्षाचे त्यावेळी विभाजन झाले होते. इंडिकेट आणि सिंडिकेट गट सत्ताधारी गटापासून अलग झाला होता. ना. ग. गोरेंच्या मते, यातले जे खरे समाजवादी असतील त्यांच्याशी आपण संपर्क साधला पाहिजे आणि त्याचबरोबर आपली एकी अजून होत नाही याचे त्यांना दु:ख झाले. त्यांच्या मते समाजवादी वाटचालीत राजकीय आर्थिक चुका झाल्या. १९४८ नंतर जगातील घटनांचा विचार केला नाही. पक्षाच्या संघटनेचा अभाव होता. उत्तर प्रदेश, बिहार या प्रांतांमध्ये पक्ष बऱ्यापैकी होता. दक्षिणेकडेही सुस्थिर होता. काश्मीर, पंजाब खुद्द दिल्ली या ठिकाणी पक्षाची यंत्रगा नव्हती. बंगालमध्ये विचित्र परिस्थिती होती. समाजवादी ध्रुवीकरणाला मदत होणार असेल तर पक्ष बंद करावा का, असेही त्यांच्या मनात येई. त्यांच्या मते, केवळ काँग्रेसविरोधाची भूमिका न घेता महागाईचा प्रश्न, घरांचा प्रश्न, भूमीचा प्रश्न हे प्रश्न हाती घेऊन समाजवादी पक्षाची बांधणी केली पाहिजे. १३

ना. ग. गोरेंच्या मते, 'प्रजासोशालिस्ट' व 'सोशलिस्ट' पक्षातील कार्यकर्त्यांचे कार्य महत्वाचे आहे. त्यांची दोन पक्षांत विभागणी झाली नसती तर देशाच्या आजच्या परिस्थितीत त्यांच्या बोलण्याला वेगळेच वजन प्राप्त झाले असते, परंतु

अशोक मेहतांपर्यंतचे दुबळे व अनिश्चित नेतृत्व प्रजासमाजवादी पक्षाच्या वाटयाला आले आणि डॉ. लोहियांसारख्या लहरी व कमालीच्या अहंकारी व्यक्तीकडे समाजवाद्यांची सूत्रे गेली त्यामुळे नाव ठेवण्यास जागा नाही अशी परंपरा लढाऊ कार्यकर्त्यांच्या पदरी असून ही हे दोन पक्ष प्रथम अप्रकटपणे व नंतर प्रकटपणे परस्परांना छेद देत राहिले. तथापि लोकसत्ताक समाजाचा विचार सतत जागृत ठेवून देशातील लोकमत तदनुकूल करून घेण्याच्या कामी, कम्युनिस्टांच्या अंतर्गत व बहिर्गत कारवाया उघड करून त्यांना पायबंद घालण्याच्या कामी आणि काँग्रेस अथवा कम्युनिस्ट अशी जनतेची विभागणी होऊ न देता लोकसत्ताक परिवर्तनाची आशा जनमाणसात कायम राखून अहिंसेच्या मर्यादेत चळवळी ठेवण्याच्या कामी या उभय दलांनी केलेली कामगिरी दुर्लक्ष करता येण्यासारखी नाही. सहकारी शेती, व्यापार व उद्योग, शिक्षणसंस्था, सांस्कृतिक मंडळे, घरबांधणी इ. क्षेत्राकडे या पक्षांनी लक्ष दिले पाहिजे, कारण समाजवादाच्या त्या जीवनपेशी आहेत.१४

१९७० साली बडोदे येथे झालेल्या प्रजासोशॅलिस्ट पार्टीच्या अखिल भारतीय अधिवेशनात ना. ग. गोरेंनी काँग्रेसशी करायच्या अर्थपूर्ण संवादाची भूमिका मांडली. इंदिरा गांधीनी संस्थानिकांचे तनखे बंद केले, बँकांचे राष्ट्रीयकरण केले, त्याचबरोबर त्या समाजवादाची भाषा बोलत होत्या. याची अनेक समाजवाद्यांना यांनी भुरळ पडली आणि आता काँग्रेस समाजवादी झाल्यासारखे त्यांना वाटू लागले. त्यामुळे काहीजण तर काँग्रेसमध्ये सामील झाले. काहींना आपला पक्ष स्वतंत्र ठेवून समाजवादाच्या अंमलबजावणीसाठी काँग्रेसशी सहकार्य केले पाहिजे, अशी जाहीर भूमिका घेतली. ह्याबाबत ना. ग. गोरेची भूमिका सावधपणाची होती. त्यांच्या मते, संस्थानिकांचे पांढरे हत्ती पोसण्याचा निर्णय किंवा बॅंकांचे राष्ट्रीयीकरण याने भुलून

जाण्याची आवश्यकता नाही. यासाठी त्यांनी फ्रान्सचे उदाहरण दिले. समाजवादी नसलेल्या फ्रान्स मध्ये बँकांचे राष्ट्रीयकरण झालेले आहे. अशा अर्थाचे ना. ग. गोरेंनी मुंबईतील कार्यकर्त्यांच्या सभेत भाषण केले होते. या बाबतीत ना. ग. गोरेंवर टीकाही झाली. बडोदे अधिवेशनात अर्थपूर्ण संवादाचा काँग्रेस सहकार्याचा ठराव मंजूर झाला. तथापि पुढाऱ्यांना हुलकावण्या देऊन काँग्रेसने या अर्थपूर्ण संवादाला कचऱ्याची टोपली दाखवून पक्ष अधिक कमकुवत करण्याचा डाव पुरेपूर साधला. १५

१९७० साली ना. ग. गोरे हे प्रजासमाजवादी पक्षाचे नेते म्हणून राज्यसभेवर निवडून आले होते. संसदेला ज्या प्रौढ अनुभवी राजकीय नेत्यांची आवश्यकता असते. त्या नेत्यांपैकी ते एक होते. ना. ग. गोरे संसदेतील प्रत्येक सार्वजनिक प्रश्नावर राष्ट्रहिताच्या दृष्टीने सखोल, चर्चा करत. आदर्श संसदेची प्रणालि विकसित होत असताना ज्या प्रकारच्या व्यक्तींची सेवा आदर्श संसद सभासद म्हणून अपेक्षीत होती त्याप्रमाणे ना. ग. गोरे यांचे वर्तन होते. ना. ग. गोरेंचा पक्ष अल्पसंख्य होता. पण मूल्यांची सतत जपणूक समग्र सभागृहाच्या आणि देशाच्या हितासाठी त्यांच्याद्वारे होई. त्यामुळे त्यांचा नैतिक प्रभाव पडे. १६

१९७० साली प्रजासमाजवादी पक्षात काँग्रेस बरोबर संवाद करावा असा प्रवाह निर्माण झाला. ना. ग. गोरे या भूमिकेस काही काळ अनुकूल होते, परंतु त्यांचा लवकरच भ्रमनिरास झाला. दोनही समाजवादी पक्षातील कार्यकर्त्यांना पुन्हा एकत्र यावेसे वाटू लागले. १९७१ च्या निवडणूकीत इंदिरा गांधी यांनी 'गरिबी हटाओ' ची घोषणा केली आणि त्यांना प्रचंड बहुमत मिळाले. या बदललेल्या राजकीय परिस्थितीत संयुक्त समाजवादी पक्ष व प्रजासमाजवादी पक्ष यांची एकजूट करण्यासाठी एस. एम. जोशी यांनी पुढाकार घेतला. ना. ग. गोरे यांनी त्यांना

तात्काळ उत्तम प्रतिसाद दिला आणि १९७२ मध्ये दोन्ही पक्षांचे एकीकरण होऊन पुनश्च समाजवादी पक्ष स्थापन झाला. एस. एम. व ना. ग. गोरे पुन्हा एकत्र आल्यामुळे महाराष्ट्रात कार्यकर्त्यांना समाधान वाटले. यावेळी कार्यकर्त्यांसमोर बोलताना ना. ग. गोरे म्हणाले, " आपल्यातील फाटाफुटीमुळे समाजवादी चळवळीचे फार नुकसान झाले. यानंतर एकजुटीने काम करून आपण हे अपयश धुऊन काढले पाहिजे. १७

१९७२ मध्ये जयप्रकाश नारायण यांनी 'भ्रष्टाचार हटाओ' अशी घोषणा केली. गुजरातमधील तरूणांच्या नवनिर्माण आंदोलनाला त्यांनी मार्गदर्शन केले. ही चळवळ बिहारमधील तरूणांनी जेव्हा प्रखरपणे सुरू केली, तेव्हा त्यांचे प्रेरणास्थान जयप्रकाशजीच होते. जयप्रकाश नारायण हे त्यांची संपूर्ण क्रांतीची कल्पना मांडीत असताना काँग्रेसच्या शासनातील भ्रष्टाचारावर टीका करीत समाजवादी पक्ष, भारतीय जनसंघ, लोकदल आदी विरोधी पक्ष जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखालील आंदोलनात सामील झाल्यावर आंदोलनाला राजकीय कलाटणी मिळाली आणि सुरूवातीच्या 'भ्रष्टाचार हटाओ' ऐवजी 'इंदिरा हटाओ' ही घोषणा होऊ लागली. इंदिरा गांधीनी हे आंदोलन दडपण्यासाठी २६ जून १९७५ रोजी आणीबाणी जाहीर करून जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई चरणसिंग, अटलबिहारी वाजपेयी आदी विरोधी पक्षनेत्यांना अटक केली. ना. ग. गोरे आणि एसेम जोशी या दोन समाजवादी नेत्यांना मात्र अटक करण्यात आली नाही. ना. ग. गोरे आणि एस. एम. या दोन्ही नेत्यांनी खंबीरपणे आणीबाणीच्या विरोधात भूमिका घेतली. ना. ग. गोरे यांनी त्यावेळी विरोधी पक्षाचे खासदार म्हणून संसदेत आणीबाणी ही लोकशाही नष्ट करणारी आहे असे स्पष्टपणे मांडून इंदिरा गांधीच्या धोरणावर कठोर टीका केली.

त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाऊन लोकांना निर्भयपणे आणीबाणीस विरोध करण्याचे आवाहन केले. ना. ग. गोरे यांनी लोकसभेमध्ये आणि उत्तर प्रदेश व बिहारमध्ये काही बैठका घेऊन विचार मांडले ते सर्व विचार एकत्र करून 'आपात कालकी उलटी गंगा' या नावाची पुस्तिका 'साधना प्रकाशनाने' प्रसिध्द केली. या पुस्तिकेमुळे ना. ग. गोरेंचे आणीबाणीच्या विरोधातील विचार देशात अनेक ठिकाणी पोहचले. ना. ग. गोरेंचा भारतातील लोकशाहीवर आघात करणाऱ्या आणीबाणीवर अचूक शरसंधान करणारा 'प्रश्नोपनिषद' हा लेखांचा आणि मुलाखतींचा संग्रह प्रसिध्द झाला. १८

२६ जूनला इंदिरा गांधीनी आणीबाणी जाहीर केली. जयप्रकाशजींच्यासह अनेक नेत्यांना विनाचौकशी 'मिसा' खाली बंदिस्त केले. वर्तमान पत्रांवर अनेक जाचक बंधने घातली. आणीबाणीमुळे जनता भयभीत झालेली होती. अशा वेळी एस. एम. जोशी आणि ना. ग. गोरे संपूर्ण देशभर छोटया-मोठया सभा घेऊन आणीबाणीच्या भयानकतेची जाणीव देत फिरत होते आणि जनतेला निर्भय बनवण्यासाठी प्रयत्न करीत होते. आणीबाणी पुकारल्यानंतर आणीबाणीला ज्यांचा ज्यांचा विरोध होता अशा सर्व पक्षांची आणि विचारवंतांची 'लोक संघर्ष समिती' संघटित झाली. लोक संघर्ष समितीत सामील झालेले पक्ष कधी एकत्रित अथवा स्वतंत्रपणेही कार्यक्रम आखून पार पाडीत असत. काही कार्यकर्ते भूमिगत झाले. सुरूवातीला काही दिवस-कार्यकर्त्यांच्या गुप्त बैठका होत होत्या. नंतर कार्यकर्त्यांच्या लक्षात आले की, आणीबाणी असली तरी राजकीय पक्षांवर बंदी नाही. फक्त १४४ कलम लागू आहे. त्यामुळे हॉलमधून जाहीरपणे कार्यकर्त्यांच्या नावाखाली प्रकट सभा घेण्यात आल्या. १५ ऑगस्ट १९७५ रोजी कार्यकर्त्यांनी सोशालिस्ट पार्टीतर्फे

जाहीर सभा आयोजित केली होती. ना. ग. गोरे या सभेचे मुख्य वक्ते होते. त्यांनी आपल्या भाषणात आणीबाणीच्या परिणामांचा अर्थ स्पष्ट करून इंदिरा गांधींच्यासह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, पोलिस अधिकारी श्री. मोकाशी यांचेपर्यंत सर्वांवर ताशेरे ओढले. त्या भाषणाने कार्यकर्त्यांना अधिक स्फूर्ती मिळाली. एस. एम., ना. ग. गोरे यांनी आणीबाणीच्या काळात लोकांना बरोबर घेऊन त्यांना निर्भय बनविण्याचे आणि आणीबाणीच्या विरोधात संघटित करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांच्या हया प्रचारामुळे 'लोक संघर्ष समितीने' ठरविलेल्या सत्याग्रहाला गती आली आणि सत्याग्रह करून शेकडो कार्यकर्ते तुरूंगात गेले.

ना. ग. गोरे आणीबाणीच्या काळात अनेक आपत्तींना सामोरे जात होते. सतत फिरणे, बोलणे, कार्यक्रम ठरविणे आणि ते पार पाडणे त्याचबरोबर 'लोक संघर्ष समिती' कार्यक्षम आणि एकजिनसी करणे, आणीबाणीतील एकाधिकारशाहीची व हुकूमशाहीची जगाला माहिती देणे, आदि कामे ते करीत होते. नोव्हेंबर ७५ मध्ये जयप्रकाशजींची प्रकृती फारच बिघडली. त्यामुळे तुरूंगातून त्यांची सुटका करण्यात आली. अशा गंभीर आजारपणातही सर्व विरोधी पक्षांना व विचारवंतांना एकत्र आणण्याचे प्रयत्न जयप्रकाशजींनी केले. त्यांना सर्व प्रकारची साथ ना. ग. गोरेंनी दिली. इतकेच नव्हे तर त्यासाठी वेळोवेळी सर्वांना एकत्र आणून अखेर ज्यांचा आणीबाणीला विरोध होता अशा विरोधी पक्षांच्या बाहेर मोकळया असलेल्या, भूमिगत अथ्वा कारागृहातील नेत्यांशी तसेच अन्य विचारवंतांशी संपर्क साधून आणीबाणीविरूध्द परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले. १९

१९७५ साली इंदिरा गांधीनी आणीबाणी पुकारली त्यावेळी ना. ग. गोरे राज्य सभेचे सभासद होते. राज्यसभेत त्यांनी इंदिरा गांधीच्या लोकशाहीविरोधी धोरणावर

सडेतोड टीका केली. त्यावेळी एसेम आणि ना. ग. गोरे या दोघांनी आणीबाणीविरूध्दची भूमिका जनतेत मांडली आणि लोकांचे मनोधैर्य टिकविण्याचे काम केले. पुढे आणीबाणी उठल्यानंतर 'जनता पक्ष' म्हणून समाजवादी पक्ष, लोकदल, जनसंघ यांनी एकत्रित निवडणूका लढविल्या आणि प्रचंड यश संपादन केले. यानंतर दिल्लीमध्ये या तीन पक्षांनी जनता पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेतला. पक्षाच्या विलीनीकरणाच्या वेळी समाजवादी पक्षातील अनेक कार्यकर्ते साशंक होते. परंतु एसेम व ना. ग. गोरें यांनी जयप्रकाशजींची भूमिका पूर्णपणे मान्य करून समाजवादी पक्ष बरखास्त करण्याच्या निर्णयाचे जोरदार समर्थन केले. पुढे जनता पक्षांतर्गत मतभेद निर्माण झाले. ना. ग. गोरेंना जनता पक्षाचे सरकार पाच वर्षे टिकावे असे वाटत होते. त्यांच्या मते, आपण मतदारांना अभिवचन दिले आहे. पुढील निवडणूकीच्या वेळी आपण फेरविचार करावा. तोपर्यंत आपले सरकार चालवावे. डॉ. लोहियांनी १९६७ साली जे केले त्याच्या पुढचे पाऊल जयप्रकाशजींनी १९७६ मध्ये सर्व कार्यकर्त्यांना टाकायला सांगितल्यावर, त्यांच्या आदेशानुसार समाजवादी पक्ष बरखास्त केला, त्याचप्रमाणे सर्व कार्यकर्त्यांनी स्वत:चे अस्तित्व विसरून जनता पक्षात काम करण्याच्या निर्णयानुसार वागण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

ना. ग. गोरे आणि एसेम यांनी मिळून राममनोहर लोहियांचे सर्व विरोधी पक्षांनी एकत्र आणण्याचे ध्येय साकार केले. जागतिक दडपणाने किंवा अन्य कारणाने इंदिरा गांधीनी १९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणूका जाहीर केल्या. २०

जयप्रकाश नारायण यांनी सर्व विरोधी पक्षांनी जनता पक्षात विलीन होऊन एकाच जाहीरनाम्यावर निवडणूका लढवाव्यात अशी भूमिका घेतली होती. त्यावेळी

१९३२ सालापासून त्यांचे सहकारी असलेल्या ना. ग. गोरे आणि एसेम यांनी जयप्रकाशजींनी पाठिंबा दिला. आणीबाणीच्या काळात भारतातील जनतेने इंदिरा गांधीनी उघड विरोध केला नव्हता. परंतु लोकांच्या मनात असंतोष धुमसत होता तो असंतोष लोकांनी १९७७ च्या निवडणूकीत मतपेटीद्वारे व्यक्त केला. काँग्रेस पक्षाचा पराभ्व झाला. समाजवादी पक्ष, भारतीय जनसंघ, संघटना काँग्रेस आणि लोकदल यांच्या नेतृत्वाखालील अकाली दल हे पक्ष एकत्र येऊन निवडणूका लढल्यामुळेच हे घडले. निवडणूकीनंतर पंतप्रधान कोणी व्हावे हा प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळी इंदिरा काँगेसमधून राजीनामा देऊन जनता पक्षात आलेल्या बाबू जगजीवनराम यांना पंतप्रधान करावे असे एसेम आणि ना. ग. गोरे यांनी जयप्रकाशजींना सांगितले. परंतु चौधरी चरण सिंगाच्या विरोधामुळे जयप्रकाश नारायण यांनी मोरारजी देसाई यांना पंतप्रधान करण्याचा निर्णय घेतला. ३० एप्रिल १९७७ रोजी समाजवादी पक्षाची बैठक होऊन जनता पक्षात विलीन होण्याच्या निर्णयास अधिकृत मान्यता दिली गेली. एसेम आणि ना. ग. गोरे यांना हा निर्णय मान्य होता, परंतु ना. ग. गोरेंच्या मते, १९३४ साली समाजवाद्यांनी एकत्र येऊन बांधलेले घर आपणच पाडून टाकले, राजकीयदृष्टया विलीनीकरणाचा निर्णय योग्य आहे परंतु मनाला अवघड वाटतो. जनता पक्षाच्या कार्यकारिणीत ना. ग. गोरे यांनी भारताचे इंग्लंडमधील हायकमिशनर व्हावे, असे सुचविण्यात आले. त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली. समाजवादी विचारांचे समर्थक आणि मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये डेप्युटी कमिशन कमिशनर असलेले विठुभाऊ वैदय यांना ना. ग. गोरे यांनी त्यांचे स्वीय सहायक म्हणून घेतले. त्यांनी हायकमिशनरच्या कार्यालयात पूर्वीपेक्षा अधिक शिस्त आणि कार्यक्षमता आणली. ना. ग. गोरे हायकमिशनर असताना इंग्लंडमधील भारतीयांशी त्यांनी सौहार्दाचे नाते जोडले. २१

सर्व विरोधी पक्ष जनता पक्षात विलीन झाले. परंतु मुलभूत मतभेद असलेल्या पक्षामध्ये ऐक्य निर्माण होऊ शकत नाही. ह्याचा पुन्हा प्रत्यय आला. जनता पक्षाच्या सरकारच्या विघटनानंतर पुन्हा समाजवादी पक्ष स्थापन करावा अशी सूचना काही कार्यकर्त्यांनी केली त्यावेळी ना. ग. गोरेंचे मन काहीसे व्दिधावस्थेत होते. एसेम यांची भूमिका मात्र स्पष्ट होती. त्यांच्या मते, समाजवादी पक्षाचे पुनरूज्जीवन न करता जनता पक्षाद्वारेच आपण लोकशाही समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी काम करावे. जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात संघर्ष वाहिनी निर्माण झाली. अनेक नवीन तरूण कार्यकर्ते आर्थिक व सामाजिक समतेसाठी होणाऱ्या लढयात आघाडीवर राहतील त्यांना समाजवादी पक्षात आणण्याचा अट्टाहास करू नये. जयप्रकाशजींचा वारसा जनता पक्षाने पुढे चालवला. ना. ग. गोरे यांनी एसेमनी मांडलेली ही भूमिका मान्य केली. मात्र दुहेरी निष्ठा असणाऱ्या व्यक्तींना व गटांना जनता पक्षात स्थान देऊ नये असे त्यांनी आग्रहाने मांडले. जनता पक्षाचे रूपांतर पुढे जनता दलात झाले आणि विश्वनाथ प्रतापसिंग हे पंतप्रधान झाले. त्यावेळी ना. ग. गोरेंना फार समाधान झाले. अखेरपर्यंत त्यांनी जनता दलाला साथ दिली. विश्वनाथप्रताप सिंग यांचे मंत्रिमंडळ पडल्यानंतर ना. ग. गोरे क्रियाशील राजकारणापासून बरेचसे दूर झाले. मात्र ते विविध प्रश्नांवर आपली मते जाहीरपणे मांडीत असत. त्यांची मते अनेकदा विवाद्य ठरली. त्यांच्या जवळच्या व्यक्तींनीही काही वेळा नाराजी व्यक्त केली. परंतु ना. ग. गोरे यांनी आपल्या मतांना कधी मुरड घातली नाही. वैज्ञानिक दृष्टिकोण आणि बुध्दिनिष्ठ तर्कसंगत विचार पध्दती ही त्यांची वैशिष्ट्ये प्रकर्षाने प्रगट होत. २२

ना. ग. गोरे यांच्या मते, लोकशाही समाजवादी हा विचार भारतात रूजण्याचे श्रेय बहुतांशी समाजवादी चळवळीस दयावे लागेल. समाजवाद आणि

लोकशाही एकत्र नांदू शकणार नाही अशी कम्युनिस्टांची भूमिका होती. त्यांनी ती भूमिका बदललेली आहे. लोकशाहीच्या चौकटीत राहून आर्थिक शोषण नाहीसे करणे व समताधिष्ठित समाज निर्माण करणे शक्य आहे हे कम्युनिस्टांनी मान्य केले आहे. एक वेळी समाजवादाची हेटाळणी करणाऱ्या काँग्रेसमधील काही नेत्यांना आणि समाजवादाला कडवा विरोध करणाऱ्या जनसंघीयांनाही समाजवादाशिवाय येथील दारिद्रयाचे निमूर्लन होणार नाही हे मान्य करावे लागले आहे.

ना. ग. गोरेंच्या मते, समाजवादाचा नेमका आशय काय याबद्दलच्या विचारांमध्ये सुस्पष्टता आली पाहिजे. भारतीय परिस्थितीच्या संदर्भात येथील शेतकरी आणि शेतमजूर हे कामगारांपेक्षा महत्त्वाचे आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. निवडणूका म्हणजे लोकशाही हे ना. ग. गोरेंना मान्य नाही आज निवणूकांमध्ये ज्या प्रचंड प्रमाणात पैसे खर्च केले जातात. त्यामधून लोकशाहीचे स्वरूप भ्रष्ट होत आहे. लोकांचा सहभाग कारभारात असावा यासाठी विकेंद्रिकरण आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रामीण जीवनातील अनिष्ट प्रवृत्ती नाहीशा झाल्या पाहिजेत. हे विचार प्रत्यक्षात येण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील. २३

समाजवादी पक्षात मतभेद विकोपाला जाऊन त्यामध्ये फूट पडली. समाजवादी पक्षाची शक्ती दुभंगली अशा कठीण प्रसंगात ना. ग. गोरेंनी मोठया धैर्याने प्रजासमाजवादी पक्षाचे अध्यक्षस्थान स्वीकारले अशा गंभीर प्रसंगी ना. ग. गोरे यांनी प्रजासमाजवादी पक्षाचे खंबीरपणे नेतृत्व केले. अखेरपर्यंत त्यांनी समाजवादी पक्षात ऐक्य निर्माण करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. महाराष्ट्रात समाजवादी विचार रूजावेत म्हणून त्यांनी प्रजासमाजवादी, समाजवादी व जनता पक्ष मार्फत अविरत परिश्रम घेतले.

## संदर्भग्रंथ


१. दंडवते मधू - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल'
गोरे गौरव संपा-सदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. २२

२. लिमये अनसूया - ना. ग. गोरे श्रध्दाजंली अंक
१५ जून १९९३ साधना पकाशन
पृ. क्र. ३९, ४०

३. दंडवते मधू - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल'
गोरे गौरव संपा-संदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. २२

४. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार ना. ग. गोरे
प्रथमावृत्ती १ मे २००६ प्रकाशन
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती
मंडळ, पृ. क्र. ५४,५५,५६,५७,५८

५. प्रधान ग. प्र. - 'नानासाहेग गोरे - एक समर्पित जीवन'
ना. ग. गोरे प्रथम स्मृतिदिन अंक १ मे १९९४
प्रक़ाशन साधना प्रेस, पुणे
पृ. क्र. ८

६. दंडवते मधू - 'नानासाहेबांची राजकीय वाटचाल'
गोरे गौरव संपा-संदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. २२

७. गोरे ना. ग. - 'नारायणीय'
साधना प्रकाशन पृ. क्र. ३२०.

८. प्रधान ग. प्र. - 'नानासाहेब गोरे एक समर्पित जीवन'
ना. ग. गोरे प्रथम स्मृतिदिन अंक
१ मे १९८४ प्रकाशन - साधना प्रेस पुणे
पृ. क्र. ८

९. तावडे नारायण - 'नारायणाच्या शब्दांत नारायण'
गोरे गौरव संपा-संदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ७६

१०. लिमये अनसूया - 'निष्ठेचे नेतृत्व' गोरे गौरव संपा-संदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ४२,४३

११. प्रधान ग. प्र. - 'नानासाहेब गोरे एक समर्पित जीवन'
ना. ग. गोरे प्रथम स्मृतिदिन अंक
१ मे १९८४ प्रकाशन - साधना प्रेस पुणे
पृ. क्र. ९

१२. गोरे ना. ग. - 'नारायणीय'
साधना प्रकाशन पृ. क्र. ३२०

१३. लिमये अनसूया - 'निष्ठेचे नेतृत्व' गोरे गौरव संपा-संदानंद वर्दे
श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई
पृ. क्र. ४४

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | गोरे ना. ग. | - | 'लोकसत्ताक समाजवादाच्या पायाभूत संस्था कुठे आहेत ?<br>हीरकमहोत्सवी निवडक साधना खंड - ३<br>लोकशाही समाजवाद, साधना प्रकाशन पुणे<br>पृ. क्र. ५२, ५३ |
| १५. | तावडे नारायण | - | 'नारायणाच्या शब्दात नारायण'<br>गोरे गौरव संपा - सदानंद वर्दे<br>श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई<br>पृ. क्र. ७७ |
| १६. | जोषी उमाशंकर | - | 'आपले नानासाहेब' गोरे गौरव<br>संपा - सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज<br>प्रकाशन मुंबई , पृ. क्र. ६, ७ |
| १७. | प्रधान ग. प्र. | - | 'नानासाहेब गोरे - एक समर्पित जीवन'<br>ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक<br>१ मे १९९४ प्रकाशन साधना प्रेस, पुणे<br>पृ. क्र. ९ |
| १८. | प्रधान ग. प्र. | - | 'महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे'<br>प्रथमावृत्ती १ मे २००६<br>प्रकाशन - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती<br>मंडळ, पृ. क्र. ५९, ६० |
| १९. | तावडे नारायण | - | 'नारायणाच्या शब्दात नारायण'<br>गोरे गौरव संपा - सदानंद वर्दे<br>श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई<br>पृ. क्र. ७८, ७९, ८० |

२०. प्रधान ग. प्र. - 'नानासाहेब गोरे - एक समर्पित जीवन' ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक १ मे १९९४ प्रकाशन - साधना प्रेस, पुणे पृ. क्र. ९

२१. प्रधान ग. प्र. - 'महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे' प्रथमावृत्ती : १ मे २००६, प्रकाशन - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृ. क्र. ६२, ६३, ६४

२२. प्रधान ग. प्र. - 'नानासाहेब गोरे - एक समर्पित जीवन' ना. ग. गोरे प्रथम स्मृतीदिन अंक १ मे १९९४ प्रकाशन - साधना प्रेस, पुणे पृ. क्र. १०

२३. प्रधान ग. प्र. - 'अंतरंगाच्या नाना छटा' गोरे गौरव संपा. - सदानंद वर्दे श्री. पु. भागवत मौज प्रकाशन, मुंबई पृ. क्र. ५१